MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक - दिपक थोरात



बीड जिल्ह्यातील तीन हजार कोटी रुपये विविध विभागातून बीड जिल्ह्यातील पिण्याच्या पाण्यासाठी खर्च करण्यात आलेला केंद्र व राज्य सरकारने भरपूर निधी देत असताना बीड जिल्ह्यातील जनतेला आज सुद्धा पाण्याच्या थेंबापासून वंचित ठेवण्याचे पाप याच बीड जिल्ह्यातील नेते मंडळींनी केले आहे यामध्ये सर्वपक्षीय नेते यांनी आपापल्या कार्यकर्त्यांना व स्वतःला पोचण्यासाठी संबंधित पाणीपुरवठ्यासाठी आलेला निधी फस्त करून योजना ह्या अपुऱ्या केलेले आहेत व बिल अधिकारी यांना टक्केवारी देत स्वतःचे बिल उचलून खराब झाल्यात जमा आहेत यावेळी बीड जिल्ह्यामध्ये अनेक गावांमध्ये आज सुद्धा विविध पाणीपुरवठ्याच्या योजना चालू असताना त्या ठिकाणी टँकरने पाणीपुरवठा करण्याची योजना आलेली आहे याला जबाबदार फक्त बीड जिल्ह्यातील नेतेमंडळी आहेत

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०१ | अंक -२४९ | शनिवार दि.०१ जुन २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४
Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -249 | SATURDAY DT. 01 JUNE 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# तीन हजार कोटी रुपये खर्च करून सुद्धा नळाला पाण्याचा थेंब नाही



**पालकमंत्री ना. धनंजय मुंडे यांनी बीडच्या पाणी प्रश्नावर भर उन्हाळ्यात एकही शब्द काढला नाही.**

**बीड जिल्हा परिषद अंतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा योजना कार्यालयात अधिकारी गुत्तेदार यांचा नंगानाच सुरूच.**

- महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागातील अनेक गुत्तेदार अधिकारी यांच्या संगमने रुपयाची गुत्तेदारी राजकीय नेत्यांच्या घशात.
- जिल्हा परिषद अंतर्गत जल जीवन मिशन १८०० कोटीचे बोगस काम गावात पाण्याचा थेंब नाही अशा सर्व योजनांची एकदा स्वतः पालकमंत्री यांनी संबंधित गावात जाऊन चौकशी करावी म्हणजे सत्य बाहेर येईल ?

**बीडचे पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांना बीड जिल्ह्यातील पाणी प्रश्न माहीत नाही का?**

**जल जीवन मिशन अंतर्गत केंद्र व राज्य शासनाच्या योजना ज्या गावात चालू आहेत त्या गावात सुद्धा टँकरने पाणीपुरवठा करण्याची वेळ कोणामुळे**

**जिल्हाधिकारी कार्यालयातील पाणीटंच विभाग कितीचा खर्च केला हे सांगू शकेल का जिल्हाधिकाऱ्यांनी पाणीटंचाईवर काय नियोजन केले हे सांगाव ?**

**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग अंतर्गत जनजीवन मिशन च्या २५ गुत्तेदारांनी पाणीपुरवठा योजना ची वाट लावली?**

**पाणीटंचाई विभाग जिल्हाधिकारी कार्यालय यांनी एकूण किती गावांमध्ये पाणीपुरवठा योजनांच्या कामांची परिस्थिती आजच्या परिस्थितीमध्ये काय आहे व त्याच गावांमध्ये सुद्धा पाणीपुरवठा टँकरने केला जात आहे का नाही याचे उत्तर दिलं पाहिजे?**

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यामध्ये सध्याच्या राजकीय वातावरण तापल्यामुळे आरोप प्रत्यारोपाने याच नेत्यानी फक्त मतदानासाठी बीड जिल्ह्यातील जनतेला मताची मागणी केली परंतु बीड जिल्ह्यातील जनतेचा घसा कोरडा आहे हे या नेत्यांना समजले नसेल का? याच बीड जिल्ह्यातील भूमिपुत्र असलेले राष्ट्रवादीचे स्टार नेते तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांनी त्यांच्याच भगिनी महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्यासाठी या निवडणुकीमध्ये आपल्या सर्व ताकती पनाला लावून पकजाताई साठी प्राचार यंत्रणा हलवली खरी पण बीड जिल्ह्यामध्ये धनंजय मुंडे पंकजाताई मुंडे यांनी बीड जिल्ह्याच्या दौरा करत असताना प्रत्येक गावामध्ये जिल्हा परिषद जलजीवन अंतर्गत,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय पाणी टंचाई विभागातील जलजीवन मिशन चे काम प्रत्येक खेडेगावांमध्ये सर्वसामान्य जनतेला पाणी मिळावं म्हणून सुमारे तीन हजार कोटी रुपयांचा निधी केंद्र सरकारने दिला होता. विद्यमान खा. डॉ प्रीतमताई मुंडे या सुद्धा बीड जिल्ह्यामध्ये फिरल्या परंतु फक्त प्रचारादरम्यान फिरल्या का असावा आता उपस्थित होत आहे

बीड जिल्ह्यातील प्रत्येक गावामध्ये जिल्हा परिषद अंतर्गत केंद्र सरकारच्या जल जीवन मिशन अंतर्गत १८०० कोटीचा निधी हा फक्त गुत्तेदारांच्या घशात घालण्यात आलेला आहे. हा निधी मतदारांच्या घशात घालण्यासाठी एकमेव नेते मंडळी जबाबदार असल्याची चर्चा ग्रामीण भागामध्ये ऐकायला मिळत आहे. बीड जिल्ह्यामध्ये भाजप असेल किंवा राष्ट्रवादी असेल महायुती महायुती, महाविकास आघाडीचे उमेदवार म्हणून पंकजाताई मुंडे, बजरंग सोनवणे यांनी यावेळी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण जिल्हा परिषद चे ग्रामीण पाणीपुरवठा योजना जिल्हा परिषद जल जीवन मिशन अंतर्गत जवळपास जिल्हाधिकारी कार्यालयातील पाणीटंचाई पाणीपुरवठा विभाग बीड नगर परिषद या सर्वांच्या बाजूने जर पाहिलं गेलं तर तीन हजार कोटी रुपये पेक्षाही वेगवेगळ्या कार्यालयातून सुमारे ३००० कोटी रुपये निधी खर्च करून गुत्तेदाराच्या घशात घालण्याची काम अधिकारी व कर्मचारी यांनी केलेला आहे. याच वेळी मात्र २०२४ लोकसभा निवडणुकीमध्ये भर उन्हाळ्यामध्ये ही निवडणूक आली परंतु एकही नेत्याच्या तोंडून पाण्यासाठी एक शब्दही निघला नाही. परंतु आज सुद्धा ग्रामीण भागामध्ये माता-भगिनींच्या डोक्यावरील घागर ही दोन ते तीन किलोमीटर पायी चालून पाणी आणण्यासाठी जाथ

त आहे आणि या योजना फक्त कागदावर आपण गुत्तेदार व नेते मंडळ यांना पोचण्यासाठी केंद्र व राज्य सरकार या सर्वांना पोचत आहे. या सर्वांच्या उपस्थितीमध्ये हा भ्रष्टाचार होत आहे का असा प्रश्न पडलेला आहे?

परंतु बीडचे पालकमंत्रीना. धनंजय मुंडे यांना बीडचा दुष्काळ आणखीन माहीत नसेल कदाचित ते आता बीड लोकसभा झाल्यानंतर त्यांच्या परळी मतदारसंघांमध्ये लक्ष देतील बीड जिल्ह्याला वाऱ्यावर सोडण्याचं काम यावेळी बीडचे पालकमंत्री ना. धनंजय मुंडे यांनी केलेला आहे. म्हणून बीड जिल्ह्यातील शेतकरी असेल किंवा बीड जिल्ह्यातील सर्वसामान्य माणूस जनावरे जेकी थेंब थेंब पाण्यासाठी दोन किलोमीटर लांब पायी चालत जाऊ लागले आहेत. तर माता भगिनी या दोन ते तीन घागरी डोक्यावर खांद्यावर घेऊन पाणी आणत आहेत. या भीष्म पाणीटंचाईमध्ये सुद्धा बीडचे पालकमंत्री ना. धनंजय मुंडे यांना गांभीर्यां राहीले नाही. परंतु यावेळी नक्कीच अधिकारी व गुत्तेदार ही तुपाशी आणि जनता उपाशी अशी गत यावी पाणीपुरवठ्याच्या माध्यमातून झालेले आहेत. विविध पाणीपुरवठ्याच्या योजनेमध्ये विविध कार्यालयातून सुमारे तीन हजार कोटी रुपयांचा निधी खर्च करून सुद्धा बीड जिल्ह्याला आज आपली तहान भागू शकले नाही. राज्य सरकार म्हणून खंत आहे. परंतु यावेळी पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांनी लक्ष घालणे गरजेचे आहे. बीडचे पालकमंत्री म्हणून धनंजय मुंडे यांनी यावेळी आढावा बैठक घेऊन संबंधित बैठकीमध्ये गुत्तेदार व अधिकारी यांनी काय केले आहे संबंधित योजनेचा निधी किती खर्च झालेला आहे. संबंधित योजनेमध्ये आजपर्यंत निधी गुत्तेदाराला वर्ग करण्यात आलेला आहे. परंतु त्या दिलेल्या निधी एवढं काम पूर्ण झालेलं आहे. का नळाला पाणी येत का नाही यामध्ये प्रामुख्याने पाहिलं तर बीड शहरातील अमृत अटल योजना असेल किंवा ग्रामीण भागातील महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाची योजना असेल किंवा जिल्हा परिषद केंद्र सरकारच्या व राज्य सरकारच्या ग्रामीण व शहरी पाणीपुरवठ्यासाठी नगरपरिषद जिल्हा परिषद या सर्व कार्यालयातून जिल्हाधिकारी कार्यालयातील पाणीपुरवठा पाणी टंचाई विभाग महाराष्ट्र जीवन प्राधिकरण या कार्यालयातील योजनाची यामध्ये नेमकं काय परिस्थिती आहे. याचं भान यावेळी पालकमंत्र्यांना राहिलेले दिसून येत नाही. पालकमंत्री यानी दुष्काळावरती व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गांभीर्याने घेत नाहीत. असा सवाल यावेळी बीड जिल्ह्यातील जनतेकडून ऐकायला मिळत आहे.

## वीस हजार रूपयांची लाच घेताना कोतवाल एसीबीच्या जाळ्यात

बीड । प्रतिनिधी

बीड : रास्त धान्य दुकानामध्ये झालेल्या धान्याच्या तफावतीबद्दल कारवाई न करण्यासाठी वीस हजार रुपयाची लाच घेणाऱ्या कोतवालासह तहसीलदारा विरोधात केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तहसीलदार अभिजीत जगताप आणि कोतवाल मच्छिंद्र माने अशी अधिकारांची नावे आहेत. धाराशिव येथील लाच-लुचपत प्रतिबंधक विभागाने कोतवालास लाच घेताना रंगेहात पकडले, तर सध्या तहसीलदार फरार आहे.

केज तालुक्याचे तहसीलदार अभिजीत जगताप यांनी काही दिवसांपूर्वी शहरातील स्वस्त धान्य दुकानांना भेटी दिल्या होत्या.



या भेटीमध्ये रास्त धान्य दुकानाच्या दुकानदारांना मिळालेले स्वस्त धान्याचा कोटा आणि वाटप यामधील तफावत आणि अनियमितता निदर्शनास आली होती. यामधील रास्त धान्य दुकानावर कारवाई न करण्यासाठी तसेच त्या दुकानाचा दुकानाचा परवाना रद्द न करण्याकरीता तहसिलदार अभिजीत जगताप यांनी पुरवठा विभागातील चतुर्थश्रेणी कोतवाल मच्छिंद्र माने यांच्यामार्फत तक्रारदारकडे ४० हजार रु. लाचेची मागणी केली होती.

मच्छिंद्र माने यांनी शुक्रवारी (दि.३१) तडजोडी अंती २० हजार रुपये स्विकारण्याचे मान्य करुन समक्ष तक्रारदार यांचेकडुन केज उपजिल्हा रुग्णालयाच्या जवळ असलेल्या एका हॉटेलमध्ये २० हजाराची लाच स्विकारताना धाराशिव येथील लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने कोतवाल मच्छिंद्र माने यांना ताब्यात घेतले. तर मुख्य आरोपी तहसीलदार अभिजीत जगताप फरार आहेत.

या कारवाईत धाराशिव जिल्हा पोलिस अधीक्षक संदीप आटोळे यांच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस उपअधीक्षक सिध्दाराम म्हेत्रे, संभाजी नगरच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे अप्पर पोलीस अधीक्षक मुकुंद आघाव यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी पोलीस उपअधीक्षक सिध्दाराम म्हेत्रे यांच्यासह पोलीस अंमलदार दिनकर उगलमुगले, मधुकर जाधव, सचिन शेवाळे, नागेश शेरकर, वाहन चालक दत्तात्रय करडे यांनी कारवाईत भाग घेतला. या प्रकरणात केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर पोलीस अधिकचा तपास करत आहेत.



## राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची २९९ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या २९९ व्या जयंती निमित्त त्यांना अभिवादन करण्यासाठी आज अहिल्यामाई होळकर चौक बीड येथे उपस्थित टाटा मोटर्सचे मॅनेजर सागर कसतुरे , सर्विस मॅनेजर विशाल सर सोडगिर, सेल्स मॅनेजर रहीस देशमुख, संतोष निर्मळ, एजाज पटेल, निखिल बोंडगे, मयुर गेंधले, नसीर शेख, प्रदिप काळे, शाहारूख पठान, संदिप चव्हाण, महेश गायकवाड, कुणाल सोडगिर समाजबांधव व मित्र परीवार उपस्थित होता.

# वाढता वाढे भ्रष्टाचार

प्रशांत बाफना
८०५५४४०३८५

राज्यातील भ्रष्टाचाराची प्रकरणे पाहता भ्रष्टाचार हा शिष्टाचार नव्हे, तर अधिकार बनला की काय, अशी शंका उपस्थित होऊ लागली आहे. पुण्यातील कल्याणीनगर अपघाताच्या घटनेनंतर रोज नवनवीन गोष्टी उघडकीस येत आहेत. गरिबांचे जीव गेले तरी चालतील मात्र, सरकार व प्रशासन यांना पोसणारे विशाल अग्रवाल यांच्यासारखे पोशिंदे जिवंत राहिले पाहिजेत, अशीच सत्ताधाऱ्यांची भावना दिसते. पोलीस प्रशासन व पुण्यातील ससून रुग्णालयातील भ्रष्ट कारभाराचे लक्तरेच या घटनेतून वेशीवर टांगली गेली आहेत. एवढी बदनामी होऊनही सरकार यातून बोध घेताना दिसत नाही. अशा घटना घडल्या की, सत्ताधारी विरुद्ध विरोधक असा सामना रंगतो. त्यांच्यातील हा सामना उंदीर- मांजराचा खेळ ठरतो. सरकार कायदे बनवते, पण ते केवळ सामान्यांसाठी असतात. पैशाच्या जीवावर मौजमस्ती करणारे धनिक सत्ताधाऱ्यांना, प्रशासनाला हाताशी धरून आपल्याला पाहिजे त्याप्रमाणे या कायद्यांचा दुरुपयोग करत असतात. पुण्यातील अपघाताच्या घटनेनंतर आमदार रवींद्र धंगेकर व शिवसेना उपनेत्या सुषमा अंधारे यांनी उत्पादन शुल्क कार्यालयात आंदोलन करत येथील अधिकारी कशाप्रकारे हप्तावसुली करतात याचे रेटकार्डच माध्यमांसमोर वाचून दाखवले. पुण्यातील पब संस्कृतीचा पर्दाफाश करणाऱ्या या दोघांनी त्यावेळी राज्य उत्पादन शुल्कमंत्री शंभुराज देसाई यांचेही नाव घेतल्याने आता देसाईंनी या दोघांवर कायदेशीर कारवाईचा इशारा दिला आहे. या दोघांनी माफी मागितली नाही तर मी ७२ तासांत संबंधितांना नोटीस बजावणार असल्याचे त्यांनी जाहीर केले आहे. देसाईंनी घेतलेला हा पवित्रा म्हणजे चोर सोडून संन्याशाला फाशी देणे, असेच म्हणावे लागेल. याप्रकरणी त्यांनी आपल्या ताब्यातील उत्पादन शुल्क अधिकाऱ्यांवर कारवाई करणे अपेक्षित आहे. राजकीय कुरघोडीतून का होईना विरोधकांनी पोलीस अवैध धंद्यांना पाठीशी घालत त्यांच्याकडून उकळत असलेल्या हप्त्याची यादी जाहीर केली आहे. त्यावर एक नजर तरी देसाईंनी टाकायला हवी होती. राज्यातील दारू दुकाने, बार व पबमध्ये अल्पवयीन मुलांना दारू पिण्यास बंदी असताना विशाल अग्रवाल यांचा अल्पवयीन मुलगा या ठिकाणी रात्री दोनपर्यंत आपल्या अल्पवयीन मित्रांसमवेत पार्टी करत होता. दारूच्या आहारी गेल्याने भरधाव वाहन चालवत त्याने दोघांना चिरडले. पुण्यात रात्रभर रंगणाऱ्या या पब संस्कृतीवर नियंत्रण कोणाचे आहे? पुणे विद्येचे माहेरघर समजले जाते. मात्र, आता ते ड्रग्ज व अवैध धंद्यांचे केंद्र बनले आहे. या शहरातील ससून रुग्णालय विविध उपचारांसाठी प्रसिद्ध होते. ते आता गुन्हेगारांचे आश्रयस्थान बनले आहे. एखादा शासकीय अधिकारी दोषी आढळला की, त्याचे निलंबन केले जाते, पण काही दिवसांनंतर तो पुन्हा त्याच पदावर रुजू झालेला दिसतो. सरकारच्या या कार्यपद्धतीमुळे सामान्य नागरिकही या भ्रष्ट कारभाराविरोधात आवाज उठविण्यास तयार नाहीत. सरकार भ्रष्ट अधिकाऱ्यांना पाठीशी घालत असेल तर सामान्यांच्या आंदोलनाला काही अर्थ राहत नाही. ससूनमधील डॉ. अजय तावरे याला याआधी निलंबित केले होते. आता अग्रवाल यांच्या मुलाच्या रक्ताचे नमुने बदलल्याप्रकरणी त्याच्यावर पुन्हा निलंबनाची कारवाई करण्यात आली. एकाच व्यक्तीचे दोनदा निलंबन होत असेल तर त्याला कायमचे घरी का बसवले जात नाही? असे भ्रष्ट अधिकारी पुन्हा आपल्या खुर्चीत स्थानापन्न होऊन भ्रष्टाचाराची मोठी साखळी निर्माण करतात. नेत्यांच्या पाठबळामुळे हे अधिकारी दिवसेंदिवस मुजोर होत चालले आहेत. आपल्याला मिळणाऱ्या हप्त्यातील ठराविक हिस्सा हे अधिकारी त्यांना पाठीशी घालणाऱ्या नेत्यांपर्यंत पोचवत असतात. पूर्वी सरकारचे प्रशासनावर नियंत्रण असायचे. आता प्रशासनच सत्ताधाऱ्यांवर नियंत्रण ठेवून आहे. त्याचे कारण म्हणजे हप्तेखोरीतून मिळणारा मलिदा. डॉ. तावरेला पोलिसांनी ताब्यात घेताच त्याने या प्रकरणातील अनेकांची नावे उघड करण्याचा इशारा दिला. त्याची मात्रा बहुधा बरोबर लागू पडलेली दिसते. त्यामुळेच दोनदा दोषी आढळूनही त्याच्यावर कारवाईऐवजी निलंबन करण्यात आले. निलंबन म्हणजे विनाविलंब पुन्हा कामावर रुजू करून घेणे, अशी सरकारी व्याख्या झाली आहे. आमदार धंगेकर, अंधारे यांनी राजकीय हेतूने आरोप केले असले, तरी त्यांनी पुण्यातील उत्पादन शुल्क विभागाचा शोधून काढलेला भ्रष्ट कारभार, हप्तेखोरी सरकारला नाकारता येणार नाही. देसाईंनी व्यक्तिगत आरोप दुर्लक्षित करून आपल्या विभागात कशा प्रकारे भ्रष्टाचार बोकाळला आहे, याची गंभीर दखल घ्यायला हवी. आमदार धंगेकर व अंधारे यांना माफी मागण्यासाठी त्यांनी जो ७२ तासांचा कालावधी दिला आहे



बीड :- तालुक्यातील येळंबघाट येथील बळवंतराव कदम माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे ग्रंथपाल जे.बी. गाडे हे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना महाराष्ट्र राज्य माध्यमिक शाळा शिक्षकेत्तर संघटनेचे जिल्हाध्यक्ष संजय डावकर, प्रसिध्दी प्रमुख सतीश बहीर आदि.

## बीड शहरातील सामान्यांना आपलसं वाटणारा नगरसेवक शेख आमेर अण्णा

बीड । प्रतिनिधी

शहरातील प्रत्येकांच्या सुख दुखात आपल्या प्रभागातील जनतेसाठी नव्हे तर बीड शहरातील तमाम सर्वसामान्यांच्या अडीअडचणीसाठी अहोरात्र झटणारा नगरसेवक म्हणजे शेख आमेर अण्णा मनात इच्छाशक्ती असली तर काही पण होतं याचा उत्तम उदाहरण शेख आमेर अण्णा सर्व सामान्य कुटुंबातून येऊन आपल्या कर्तुत्वाच्या जीवावर सामान्यांच्या जनतेवर अधिराज्य गाजवणारा राजा माणूस म्हणून बीड शहरात नगरसेवक आमेर अण्णा यांची ओळख समाजसेवा करणयाची इच्छा असेल तर अनेक अडचणीवर मात करुन गोरगरीब जनतेची सेवा करणारे अनेक समाजसेक आहेत कसलाही राजकीय वारसा नसताना गोरगरिबांच्या हाकेला धावून जाणारे नगरसेवक शेख आमेर अण्णा हे आहेत बीड शहरातील वार्ड क्रमांक ८ मधुन नगरसेवक म्हणून निवडून आलेले शेख आमेर अण्णा यांनी गोर गरीब जनतेला रेशन कार्ड उपलब्ध करून दिले आहेत वार्डात लाईट पाणी इत्यादी सुविधा जिल्हा रुग्णालयात गोरगरिबांना मदत करतात कोरोना काळात त्यांनी अनेक कुटुंबांना




धान्य वाटप किराणा वाटप करुन गोरगरीब जनतेची सेवा केली करोना काळात रुग्णांना शासकीय हॉस्पिटल मध्ये ऍडमिट करून रुग्णसेवा ही त्यांनी दिली लोकांच्या सुख दुखात सदैव सहभागी असतात आपले कार्य पूर्ण तत्वावर नेण्याचा प्रयत्न करतात बीड शहरात त्यांचा मोठा मित्र परिवार आहे व त्यांच्या सामाजिक सेवेतून ते जनतेच्या सेवेसाठी कधीही तत्पर आहेत राजकीय मतभेद बाजूला ठेवून जनतेची सेवा करणे ही काळाची गरज आहे आणि या कसोटीत शेख आमेर अण्णा हे खरे ठरतात त्यामुळे अशा समाजसेवकाची समाजात वेगळी ओळख नगरसेवक शेख आमेर अण्णा यांना वाढदिवसानिमित्त मन:पूर्वक शुभेच्छा त्यांना उदंड आयुष्य लाभो हीच सदिच्छा

## कु.ऋतुजा बबन खळगे उत्तीर्ण ऊसतोड कामगारांच्या मुलीला ८५% गुण

बीड । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील पुसरा येथील ऊसतोड कामगारांची मुलगी कु.ऋतुजा बबन खळगे या विद्यार्थिनीला १०वी बोर्डाच्या परीक्षेमध्ये ८५/ गुण मिळाले कु.ऋतुजा ही एक शेतकऱ्याची गरीब ऊसतोड कामगारांची मुलगी आहे आई-वडील शिक्षणासाठी आजी आजोबा जवळ सोडून ऊस तोडणीसाठी पश्चिम महाराष्ट्रात जातात.घरची परिस्थिती अगदी बेताची ऊसतोड कामगारांच्या मुलांची शिक्षणाची परवड होत असताना.कु.ऋतुजा खळगे अगदी हलाखीच्या परिस्थितीमध्ये अभ्यास करून कुठलाही ट्युशन, एक्स्ट्रा क्लास न करता आपल्या गरिबीची जाण ठेवत स्व अभ्यासाने १० वीच्या परीक्षेमध्ये ८५% गुण घेऊन चांगल्या गुणाने पास झाली आहे. आई-वडील ऊसतोड




मजूर असतानाही मुलींच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष न करता बीड येथील राजस्थानी माध्यमिक विद्यालयामध्ये तिचा प्रवेश घेतला.राहण्याची सोय वसतिगृहात राहुन कु.ऋतुजा बबन खळगे ही चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाल्याबद्दल तिचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.. कु. ऋतुजा बबन खळगे या विद्यार्थिनीचे डॉक्टर होण्याचे स्वप्न आहे.

## पंढरीनाथ कांबळे यांचे वृद्धपकाळाने दु:खद निधन!

**बीड । प्रतिनिधी**

**पंढरीनाथ धोंडीराम कांबळे यांचे दि. ३० मे २०२४ रोजी रात्री ९.०० वाजताच्या दरम्यान वृद्धपकाळाने निधन झाले. वयाच्या ७४ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. पंढरीनाथ कांबळे भेसळ खात्यातील निवृत्त वरिष्ठ लिपिक होते. याबरोबरच सामाजिक कार्यात त्यांचा नेहमीच सक्रिय सहभाग राहिलेला आहे.**

आंबेडकर चळवळीमध्ये त्यांनी मोलाचे योगदान दिलेले आहे. बीड शहरातील माळीवेस भागातील मूळचे रहिवासी असणारे पंढरीनाथ कांबळे सध्या श्रीराम नगर भागात राहायला होते. त्यांच्या पार्थीवावर अमरधाम मोंढा स्मशानभुमी बीड येथे दि.३१



मे रोजी दुपारी १.०० वाजता दरम्यान अंत्यसंस्कार करण्यात आले. या वेळी राजकिय व सामाजिक क्षेत्रात काम करणारे व्यक्ती मोठ्या संख्येने उपस्थित होते. पंढरीनाथ कांबळे यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, सुना नातवंडे असा मोठा परिवार आहे.



## सार्वजनिक बांधकाम विभाग कर्मचारी निवृत्त


बीड(प्रतिनिधी)

सार्वजनिक बांधकाम विभाग कर्मचारी श्री शेख उस्मान हुसेन हे दिनांक ३१.०५.२०२४ रोजी, ३९ वर्ष सेवा पूर्ण करुन निवृत्त झाले व अंबादास सुपेकर यांची सेवा-समाप्ती झाली . या निमित्ताने शासकीय विश्रामगृह येथे दोघांना सत्करित करण्यात आले.यावेळी कार्यकारी अभियंता श्री.तोंडे साहेब व उपविभागीय अभियंता श्री. बोराडे साहेब , श्री गौंड साहेब , श्री खलाटे साहेब, श्री मिसाळ साहेब, श्री पवार दादा, श्री मोरे साहेब, श्री नाटकर साहेब , श्री भांगे साहेबन,श्री फुले साहेब, श्री अकबर शेख, श्री समीर शेख , श्री भुसनार साहेब, आणि सर्व सार्वजनिक बांधकाम विभाग आणि उपविभाग येतील कर्मचारी यांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात पार पडला आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या बद्दल सर्व माझ्या सहकाऱ्यांचे आभार मानले .

## तांडव नृत्याने अनुभवले शिवाचे रौद्र रूप ! भस्म उटी ,रूंड माळा ,हाती त्रिशूळ ,नेत्री ज्वाळा !

शिरूर कासार(प्रशांत बाफना)

येथील धाकटी अलंकापुरी म्हणजेच सिध्देश्वर संस्थान ईथे नुकतीच महंत स्वामी विवेकानंद शास्त्री यांच्या रसाळ वाणीतून भागवत कथा संपन्न झाली ,या संगीत कथेला प्रसंगानूरूप पात्र सजावट करून कथेतील प्रसंग समक्ष दर्शन घडवले गेले ,कथेच्या समारोपाला शिवाचे तांडव नृत्य काय असते याची अनुभूती अनुभवली , रौद्र रूप व तांडव नृत्य करत असलेल्या महादेवाचे हातात त्रिशुळ ,गळ्यात रूंड माळा आणि नेत्रातून अग्निच्या ज्वाळा प्रत्यक्षात पाहिल्यानंतर भोळा असणारा शंकर कोपला तर त्याचे रूप किती भयानक असते हे दिसून आले .कथेत झाकी कलाकार तथा शास्त्रीय कथक नृत्य कलाकार थेट वृंदावन येथून अजय या एकविस वर्षाच्या कृष्णप्रेमीला बोलावले होते ,सात दिवसात त्याने वेगवेगळ्या प्रसंगाची सृष्टी साकार केली होती ,वसुदेवाच्या टोपलीतून कृष्ण यमुना पार करतांना ,खोडकर बालकृष्ण ,मटका फोड कृष्ण तर रूखमिनी स्वयंवर ,मयूर नृत्य तर समारोपाला शिवतांडव नृत्य सादर करून महादेवाच्या रौद्ररूपाचे साग्रसंगित दर्शन घडवले होते .अजयच्या या कलेला रसिकांनी भरभरून साथ दिली व पुन्हा महाशिवरात्र सोहळ्यात येण्याचा आग्रह देखील केला .




## ढेकणमोहा येथे पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी

ढेकणमोहा (प्रतिनिधी)

बीड तालुक्यातील ढेकणमोहा येथे प्रतीवर्षी प्रमाणे पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन शांतीब्रह्म ह. भ. प. नवनाथ बाबा महाराज गोरक्षनाथ टेकडी यांच्या हस्ते करण्यात आले. यां कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून अरुण नाना डाके माजी सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती बीड याची उपस्थिती होती. या कार्यक्रम प्रसंगी अरुण नाना डाके यांनी आपले मनोगत व्यक्त करताना



राजमाता अहिल्याबाई होळकरांनी या एक चाणक्य आणि सुधारणावादी राज्यकर्त्या होत्या त्यांनी महिलां सक्षमीकरण आणि समाज कल्याणासाठी त्यांनी अहोरात्र काम केले आसे बोलताना सांगीतले, या कार्यक्रम प्रसंगी नागेश शिंदे माजी सरपंच, हानुमान देवकते, केलास देवकते, भगवान देवकते, रामा भोगे, महादेव थापडे, उपसरपंच परमेश्वर थापडे, लक्ष्मण ठाकुर, भास्कर देवकते, ज्ञानदेव देवकते, कोयटे शिवाजी सर, डॉ. खेडकर, विजयसिंह ठाकुर, दयाराम पवार, डिगाबर देवकते सर, जगतसिह ठाकुर, बळीराम थापडे, श्रीकीसन देवकते, शामराव राऊत, बाजीराव पवार, रमेश ठाकूर, रमेश देवकते, उत्तम देवकते, दिलीप देवकते, राधाकिसन थापडे, अंगद तुकडे, शामराव देवकते, शरद देवकते ग्रामपंचायत सदस्य, नंदु शिंदे ग्रामपंचायत सदस्य, भारत देवकते, शामराव जाजु, अभिषेक देवकते ,ज्ञानेश्वर देवकते, रामकिसन करांडे, विकास देवकते, महादेव शिंदे, रामा चौरे, पवन चौरे, जालिंदर भोगे, अरविंद शिंदे, बापुराव शिंदे, पोपट शिंदे, महादेव देवकते आधी यावेळी उपस्थित होते. या कार्यक्रमांचे सुत्रसंचलन शामराव राऊत यांनी केलं तर कार्यक्रमाचे आभार आयोजक हानुमान देवकते यांनी मांनले.

## अनाधिकृत होर्डिंग्ज धारकांना सीईओ निता अंधारे यांचा वरदहस्त उपायुक्त नगरपरिषद प्रशासन संचनालयाला तक्रार:- डॉ.गणेश ढवळे

**बीड:- मुंबईच्या घाटकोपर येथील होर्डिंग्ज दुर्घटनेत १७ जणांचा मृत्यू झाल्यानंतर उपायुक्त नगर परिषद प्रशासन संचालनालयाने बीड नगर परिषदेला शहरातील लेखी पत्र पाठवून शहरातील अनाधिकृत होर्डिंग्ज हटविण्याचे संबंधित प्रकरणात कारवाई करण्याचे आदेश दि.१७ मे रोजी दिले होते. अनाधिकृत होर्डिंग्ज २४ तासात हटवण्यात आले नाही तर फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले होते.मात्र याघटनेला १५ दिवस उलटूनही अद्याप होर्डिंग्ज हटविण्यात आले नसुन कोणतीही कारवाई करण्यात आली नाही.मात्र याउलट मुख्याधिकारी निता अंधारेंकडुन अनाधिकृत होर्डिंग्ज धारकांची पाठराखण करण्यात येत असुन कारवाई करण्याऐवजी पालिकेने ते वैध करण्यासाठी व्यावसायिकांना आठवड्याची मुदत देऊन स्ट्रक्चरल आडीट खाजगी अभियंत्या मार्फत करण्याच्या सुचना २० मे रोजी दिल्या आहेत.त्यामुळे उपायुक्त नगर परिषद प्रशासन संचालनालयाच्या आदेशाची अवमानना केल्याप्रकरणी जबाबदार मुख्याधिकारी नगरपरीषद बीड निता अंधारे यांच्यावर प्रशासकीय कारवाई करण्यात यावी अशी मागणी लेखी निवेदनाद्वारे सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे.**

घाटकोपर मुंबई येथील होर्डिंग्ज कोसळुन घडलेल्या दुर्दैवी घटनेनंतर त्याची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून बीड शहराच्या कार्यक्षेत्रामध्ये तातडीने याबाबतच्या उपाययोजना करण्यात येत असुन विना परवाना होर्डिंग्ज ,बनर, फलक लावण्यासाठी उभा करण्यात आलेला लोखंडी ढाचा व पोस्टर,बनर फलक २४ तासांच्या आत काढुन घेण्यात यावा नसता मुदतीनंतर आपणा विरोधात रितसर फौजदारी गुन्हा नोंद करून अनाधिकृत होर्डिंग्ज,बनर ,फलक लावण्यासाठी उभा करण्यात आलेला लोखंडी ढाचा व पोस्टर ,फलक काढुन घेण्यात येईल व त्याचा रितसर खर्च आपणाकडून वसुल करण्यात येईल असे पत्रक सीईओ निता अंधारे यांनी काढुन १५ दिवस उलटूनही अद्याप एकावरही कारवाई न झाल्याने फौजदारी कारवाईचं नेमकं घोडं कुठं अडलं असा प्रश्न नागरीकांकडुन विचारला जात आहे.



# गांजा विक्री करणारी टोळी पकडली

## सव्वा चौदा लाखाचा मुद्देमाल जप्त

बीड । प्रतिनिधी

गांजा विक्री करणारी टोळी पकडण्यात आली आहे, यावेळी गांजासह १४ लाख १२ हजार ७३६ रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई बीडच्या स्थानिक गुन्हे शाखेने केली आहे. पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांनी जिल्ह्यातील अवैध धंद्यावर कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत. त्याअनुषंगाने पोलीस निरीक्षक अशी स्था.गु.शा.बीड यांनी अवैध धंद्याबाबतची गोपनिय माहिती काढुन जास्तीत जास्त कारवाई करण्यासाठी स्था.गु.शा. पथकांना मार्गदर्शक सुचना दिलेल्या आहेत. दि. ३० मे २०२४ रोजी मा. अपर पोलीस अधीक्षक, बीड श्री. सचिन पांडकर साहेब यांना गोपनिय बातमीदार मार्फत बातमी मिळाली की, अंबाजोगाई वरुन धारुर, तेलगाव, माजलगाव मार्गे जालना येथे एक पांढऱ्या रंगाची हयुंदाई एक्सेंट कंपनीच्या कारमध्ये गांजाची वाहतूक होत आहे


खात्रीशिर माहिती मिळताच मा. अपर पोलीस अधीक्षक बीड यांनी स्थानिक गुन्हे शाखाचे पोलीस निरीक्षक श्री. संतोष साबळे यांना कारवाईचे आदेश दिल्यावरुन पोनि स्थागुशा यांनी त्यांचे सह श्री. पोउपनि खटावकर व स्टाफ यांचेसह तेलगाव ते नित्रुड शिवारातील यशवंत हॉटेल समोर वेगात येत असलेल्या गाडीला थांबुन तपासणी केली असता सदर हयुंदाई एक्सेंट कारचे डिक्कीमध्ये अंमली पदार्थ गांजाचा माल मिळून आला असुन सदर अंमली पदार्थ वाहतूक करणारे आरोपी १) दत्ता नाथप्रसाद पवार वय २५ वर्षे रा. पांगरकर नगर, जालना,



### बीड एलसीबीची मोठी कारवाई

२) विजय सुनिल पवार वय २१ वर्षे रा. लक्ष्मीनारायणपुरा, जालना, ३) कैलास गणेश पवार वय २९ वर्षे रा. लक्ष्मीनारायणपुरा, जालना, ४) विकास अनिल गडगुळ वय २० वर्षे रा. महाराष्ट्र द्वार शिवाजीनगर जालना यांना ताब्यात घेण्यात आले आहे. जप्त केलेला गांजा बजनी ६० किलो १४६ ग्राम गांजा किंमती अं. ९,६२,३३६/-, तसेच गुन्हयात वापरलेली ह्युदाई एक्सेंट कार, चार मोबाईल असा एकुण १४,१२,७३६/- मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील आरोपींना अधिक विचारपुस करता

त्यांनी त्यांचे इतर आणखीन दोन साथीदारांची नावे कळविलेली असून गुन्हयात त्यांचा सहभाग नोंदविण्यात आला असून त्यांचा शोध घेणे चालु आहे. सदर गुन्हयात एकुण सहा आरोपी विरुध्द पो.स्टे. दिंद्रुड येथे गुरनं १०६/२०२४ कलम २० (ल) गुंगीकारक औषधीद्रव्य आणि मनोव्यापारास परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ अन्वये ३१/०५/ २०२४ रोजी गुन्हयाची नोंद करण्यात आली आहे.


# बचुटे ईशांत, शेख आरेफ, शेख लईक़ यांचे इयत्ता दहावीत घवघवीत यश

बीड । प्रतिनिधी

शहरातील बचुटे ईशांत मनोज याने ९१.६०, शेख आरेफ अशफाक याने ८६.८० आणि शेख लईक़ युसूफ़ याने ७५.८० टक्के गुण मिळवून इयत्ता दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे. बचुटे ईशांत चे आई-वडील सौ व श्री मनोज बचुटे हे सहशिक्षिका व सहशिक्षक आहेत तसेच शेख आरेफ चे आई-वडीलही सहशिक्षिका व सहशिक्षक आहेत. शेख लईक़ हा मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांचा मुलगा आहे. तिघांनीही इयत्ता दहावीत मिळविलेल्या घवघवीत यशामुळे त्यांचे समाजातील सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक रमेशराव गंगाधरे (नाना), एम.ए.रऊफ (दादा), मनोज बचुटे सर, शेख मज़हर (ताया), शेख अशफाक सर आणि एस.एम.युसूफ़ यांनी तिघांचेही अभिनंदन करून पुढील शिक्षणासाठी हृदयी शुभेच्छा दिल्या आहेत.

# सुरेश जी प्रधान साहेब यांच्या बद्दल केले अनमोल विचार व्यक्त

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा परिषद शिक्षण विभागातील लेखा अकाउंटंट सुरेश प्रधान यांचे कार्य अतिशय प्रधान आणि कौतुकास्पद असल्याचे आज त्यांच्या सेवानिवृत्त कार्यक्रमाच्या निमित्ताने बोलताना बीड जिल्हा परिषदेचे वित्त विभागाचे सर्वेसर्वा केंद्रे साहेब यांनी आपले अनमोल विचार व्यक्त करताना सांगितले की प्रधान साहेब हे प्रशासनातील एक अतिशय उत्कृष्ट चमकता तारा आहे त्यांनी याच्या अगोदर शिरूर कासार सह बीड जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये त्यांनी आपली सेवा केली आहे

तसेच बीड पंचायत समितीच्या माध्यमातून देखील त्यांनी लेखा विभागाच्या माध्यमातून अनेक गोरगरीब लोकांना रमाई आवास योजनेच्या घरकुलाच्या संदर्भात चेक देण्याचे कार्य असो किंवा जलसिंचन विहिरीचे बिल असो हे त्यांनी कोणालाही अडून न धरता कुठलीही अपेक्षा न करता प्रामाणिकपणे तात्काळ मजुराच्या खात्यावर त्यांनी पेमेंट केले म्हणून पंचायत समिती परिसरातून देखील प्रदान साहेब हे सेवानिवृत्त झाल्यामुळे त्यांच्या कार्याचे गोरगरीब लोकांना ग्रामीण भागातील ज्यांना घरकुल मिळाले आहेत अशा लोकांमधून देखील प्रधान साहेबांच्या कार्याचे मोठ्या प्रदान कार्याचे कौतुक केले जात आहे आणि त्यांनी कधीही कोणाला अडून कुठल्याही क्षणी पाहिले नाही त्यांनी त्यांचे कार्य अतिशय प्रामाणिकपणे आज सेवानिवृत्त पर्यंत केले आजच्या दिनीदेखील त्यांनी बीड जिल्ह्यातील सर्व शिक्षण विभागातील शिक्षकांच्या पगारी तसेच कर्मचाऱ्यांच्या पगारी देखील त्यांनी चलता चलता त्यांनी सर्वांना त्यांच्या लेखा विभागाच्या माध्यमातून सोडल्या यामुळे अतिशय दिलदार आणि उत्कृष्ट सुसंस्कृत व्यक्तिमत्व प्रदान यांचे कार्य अस्मरणीय राहील असे मी एक बीड जिल्हा परिषद विभागातील वित्त विभागातील एक प्रशासक म्हणून माझे विचार व्यक्त करतो या प्रसंगी उपस्थित असलेले जिल्हा परिषद



विभागातील शिक्षण विभागातील उपशिक्षणाधिकारी बोराडे मॅडम सह शिक्षण विभागातील सर्व अधिकारी कर्मचारी सह पत्रकार वकील डॉक्टर्स प्रधान साहेबावर सर्वच प्रेम करणारे नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते आणि प्रधान साहेबांना त्यांच्या उर्वरित आयुष्यासाठी मनस्वी भरभरून सर्वांच्या वतीने शुभेच्छा देण्यात आल्या आणि हा सेवानिवृत्तीचा कार्यक्रमातिशय धुमधडाक्यात आणि दर्दी शिस्त शांततेमध्ये संपन्न झाला हा कार्यक्रम संपल्यानंतर मी ही आमचे सन्माननीय मित्र सुरेश जी प्रधान साहेब यांची प्रत्यक्षात भेट घेऊन त्यांना आमच्या कुलकर्णी कुक्कडगावकर परिवाराच्या वतीने आणि साप्ताहिक समीकरण वार्ता परिवाराच्यावतीने तसेच दैनिक न्याय टाइम्स परिवाराच्या एक छोटेसे गुलाबाचे पुष्पगुच्छ देऊन उदंड भावी आयुष्याच्या मनस्वी शुभेच्छा दिल्या तोच हा एक अनमोल क्षण .

# सोनदरा गुरुकुलातील विद्यार्थी चमकले

पाटोदा: नितिन भोंडवे

सोनदरा गुरुकुलातील १० वीच्या विद्यार्थ्यांनी यावर्षीच्या परीक्षेत उत्तम यश मिळवले आहे. दरवर्षी प्रमाणे यावर्षी ही गुरुकुलातील विद्यार्थ्यांचा निकाल हा १००% लागला आहे .त्यात सारंग उल्हास पवार याने ९६.६०% गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला आहे. निखिल वाघ याने ९३.६०% गुणांसह द्वितीय क्रमांक मिळवला, तर धीरज शिनगारे याने ९३.२०% गुणांसह तृतीय क्रमांक मिळवला आहे. यावर्षी ९० ते १००% गुण मिळवणारे ११ विद्यार्थी आहेत, तर ८० ते ९०% गुण मिळवणारे १२ विद्यार्थी आहेत. ७० ते ८०% गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्याही ५ आहे.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे सोनदरा गुरुकुल शाळेचे संचालक, मुख्याध्यापक आणि सर्व शिक्षक मनःपूर्वक अभिनंदन करीत आहेत. त्यांच्या यशात पालकांचे योगदान देखील महत्त्वाचे ठरले आहे.सोनदरा गुरुकुलाची



स्थापना १९८६ मध्ये कै. सुदाम काका आणि सिंधू मामी यांनी नानाजी देशमुखांच्या मार्गदर्शनाखाली केली होती. गुरुकुलात मुलांच्या शैक्षणिक जडणघडणीसोबतच त्यांच्यात संस्कार रुजवण्यावरही भर दिला जातो. मुलांच्या कौशल्यांच्या आणि गुणांच्या विकासावर गुरुकुलात विशेष लक्ष दिले जाते. काका मामींच्या अथक परिश्रमातून आकारास आलेल्या

गुरुकुलाची वाटचाल पुढे सुरू आहे.शाळेच्या या उल्लेखनीय यशाबद्दल शाळेचे सर्व शिक्षक, विद्यार्थी आणि पालक वर्ग अभिनंदनास पात्र आहेत. पुढील वाटचालीसाठी सर्वांना हार्दिक शुभेच्छा!

# आयशर टेम्पो - रिक्षाची धडक, रिक्षा चालकाचा जागीच मृत्यू

धारुर घाटात अपघाताची प्रमाण सुरूच

धारूर । प्रतिनिधी

आयशर टेम्पो व रिक्षाची समोरासमोर धडक लागून झालेल्या अपघातामध्ये रिक्षा चालकाचा जागीच मृत्यू झाल्याची घटना धारूर घाटामध्ये शुक्रवारी दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास घडली .माऊली भास्कर घुले वय ३० वर्षे रा . गावंदरा असे मयत झालेल्या रिक्षा चालकाचे नाव आहे .

धारूर येथील घाटात धोकादायक वळणामुळे अपघाताचे सत्र सतत सुरूच आहे .शुक्रवारी दुपारी धारूर कडून आयशर टेम्पो तेलगाव कडे जात होता . यावेळी तेलगाव कडून येणाऱ्या रिक्षास घाटातील धोकादायक वाहनाच्या ठिकाणी समोरा -समोर धडक झाली .या अपघातात रिक्षाचालक माऊली भास्कर घुले गंभीर जखमी झाला . त्यास स्वराती रुग्णालय अंबाजोगाई येथे नेत असताना त्याचा मृत्यू झाला .अपघातामध्ये आयशर टेम्पो व रिक्षाचा समोरील भाग चकाचूर झाला आहे . रस्त्यावर अपघात झाल्यानंतर दोन्ही वाहाणे बराशीमध्ये गेले .धारूर घटात अपघाताचे प्रमाण वाढले असून गुरुवारी रात्रीही एका दुचाकी स्वरास टिप्परची धडक लागून मृत्यू झाल्याची घटना घडली होती .अवघ्या २४ तासात घाटामध्ये अपघातामुळे दोघांचा बळी गेला आहे .माऊली घुले यांच्यावर शुक्रवारी सायंकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले .गावंदरा गावावर यामुळे शेककळा पसरली होती .

धारूर घाटामध्ये अनेक दिवसापासून अनेक अडचणींचा

सामना वाहन चालक प्रवासी करत आहेत. या घाटातील अरुंद रस्ता संरक्षण भिंत अशा अनेक अडचणींचा सामना वाहन चालकांना रोज करावा लागतो यात मोठ्या संख्येने अपघात होऊन मृत्यूंची संख्या वरचेवर वाढत आहे. तसेच अपंगत्व आर्थिक नुकसान




अशा अनेक घटनेला प्रवासी वाहन चालकांना तोंड द्यावे लागत आहे. निष्पाप नगरिकांचा बळी ला कारणीभूत लोकप्रतिन अधिकारी असून त्यांच्यावर खुणाचा गुन्हा नोंद करावा अशी मागणी तालुक्यातील नागरिक करत आहेत.

# हुंडा फक्त मुलगाच मागतो का...?



समीर आज मुलगी पाहायला निघाला होता. सकाळपासून समीरच्या आईची खूप गडबड सुरू होती. तसे समीरच्या घरी समीर आणि समीरची आई दोघेच फक्त. मुलगी पाहण्याकरता खास समीर मुंबईहून आला होता. समीर रुममध्ये आवरत होता. इतक्यात समीरची आई आली. समीर बेटा, आवर पटकन. पाहुणे वाट पाहत असतील हं. जाऊ चल. आलोच. समीर आवरुन हॉलमध्ये आला. आई तिथेच होती. चला आईसाहेब असं म्हणून तो गाडीच्या चाव्या घेऊन बाहेर पडला. पाठोपाठ आईसुद्धा बाहेर पडली. गाडीमध्ये बसल्यानंतर समीरने आईला विचारले,

तू भेटली आहेस का त्यांना या आधी ?

हो रे.. एकदा भेट झाली आहे आमची..

माझ्या अटींबद्दल सांगितले का..

हो ते तयार आहेत. अगदी तुझ्या मनासारखंच होईल.

आईच्या या उत्तरावर समीर किंचित हसला. ते दोघे मुलीच्या घरी पोहोचले.

मुलीच्या वडिलांनी समीर आणि आईचे स्वागत केले.

घरी बाकी साऱ्याची ओळख करून दिली आणि मुलीच्या आईला म्हणाले,

किमयाला बोलवा.( म्हणजे मुलगीच नाव )

हो.. किमयाच्या आई हसतमुखाने म्हणाल्या.

थोड्या वेळाने किमया आली. शिडशिडीत, सावळी, सुंदर किमया. उंच, गोऱ्या समीरला शोभेल अशी. समीरला किमया पाहताक्षणी आवडली. तिने समीरच्या आईला वाकून नमस्कार केला आणि समीरच्या बरोबर समोर अलगद बसली.

काही वेळ असाच बाकी बोलण्यात निघून गेला. नंतर किमयाच्या वडिलांनी तिला व समीरला एकांतात पाठवले. समीर व किमया गच्चीत आले होते. दोन-चार शब्दाची देवाण-घेवाण झाल्यानंतर समीर म्हणाला, तुम्हाला मुंबईला यावं लागेल लग्नानंतरहो.. ते माहिती आहे की मला कसं काय ?म्हणजे तुमच्या आई तसं म्हणाल्या होत्या म्हणून तर तयार झाले ना मी लग्नाला.अस्स बरतसं तर मी आईलाही आताच नेणार होतो पण ऐकत नाहीत आईसाहेब... यावर किमया म्हणाली, म्हणजे लग्नानंतर त्यासुद्धा येणार का मुंबईला ?

हो.. अर्थात समीरच्या या उत्तरावर किमयाच्या चेहऱ्यावरच्या छटा बदलल्या.काय झालं ?काही नाही

सांगा.. बिनधास्त. मनात शंका ठेवून राहू नका.खरं सांगायचं तर तुम्ही एकटे आहात आणि वेल सेटल आहात म्हणून मी होकार दिला होता आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे तुम्ही मुंबईसारख्या सिटीमध्ये सेटल आहात, कारण पुण्या-मुंबईसारखं मनमोकळं इथे जगता येत नाही म्हणून मी तयारही झाले होते. पण, आता तुमच्या आई येणार म्हणजे

तिला मध्येच तोडत समीर म्हणाला,

मला कळालं तुम्हाला काय म्हणायचे आहे, चला जाऊ या.पणउरलेलं खाली जाऊन बोलू

ते दोघे हॉलमध्ये आले. त्यांना पाहून किमयाचे बाबा मिश्कीलीने बोलले,लवकर आलाततर मग तुम्ही कळवा आम्हाला मग पुढील बोलणी करू.हो, नक्की.. समीरच्या आई बोलल्या.मला बोलायचं आहे सॉरी पण हे लग्न नाही होऊ शकत समीरच्या या वाक्यावर सगळे खूप दचकले..का ? काही प्रॉब्लेम ? किमयाचे बाबा म्हणाले.

अक्च्युअली, मला लग्नानंतर फक्त तुमच्या मुलीचा नवरा नाही तर या घरचा जावईही व्हायचं आहे. पण तुमच्या मुलीला माझ्या घरची सून नाही व्हायचं.म्हणजे.. किमयाचे बाबा म्हणाले.म्हणजे, तिला फक्त मी हवा आहे. माझी आई नको. माझी नाती नकोत आणि सर्वात महत्त्वाचे हुंडा तर मला पटतच नाही तो देणे आणि घेणे हे मला आवडत नाही.

पण आम्ही हुंडा मागितला तरी कुठे? आणि तुमच्या आईंनी आधीच सांगितले की तुम्हाला हुंडा नको म्हणून.

हो, आम्हाला नकोच आहे हुंडा पण तुमच्या मुलीला हवायकाही पण बोलू नका. मी असं काही मागितलं नाही आहेवेल सेटल, पुण्या-मुंबईत राहणारा, एकुलता एक, त्याच्या आई-वडिलांची जबाबदारी नको हा हुंडाच झाला की आणि तो देणं मला जमणार नाही. लग्नानंतर जर आम्ही तुम्हा मुलींची सारी जबाबदारी घेतो तर तुम्हाला आमची नाती सांभाळायलासुद्धा नको का ?

जर आम्ही आमची मानसिकता बदलतो आहोत तर तुम्ही तुमची वेगळीच मानसिकता तयार करत आहात एखादी गोष्ट आयती मिळवण्यापेक्षा ती परिपूर्ण करण्यात खरी गंमत आहे. एखाद्याला स्विकारताना त्याच्या गुण-दोषांसोबत त्याची नातीसुद्धा मनापासून स्विकारली तरच नातं खुलतं असो ! चल आई निघू या आपण.

असे म्हणून समीर निघून गेला आणि निरुत्तरीत होऊन किमया व तिच्या घरचे त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहत होते.मुलगा सरकारी नोकरीला पाहिजे, स्वत:चे चांगले घर पाहिजे, खूप बँक बँलंस पाहिजे, चारचाकी गाडी असावी आणि मुलाकडे खूप प्रॉपर्टी असावी... हा पण एक हुंडाच आहे ना.

वरच्या लेख वर प्रतिसाद-

मुलीला सर्व सुखसोयी मिळाव्यात हा प्रत्येक आई वडिलांचा प्रयत्न असतो. पण मुलीला लग्नासाठी तयार करताना आई-वडिलांनी तिला आधी सासरची जबाबदारी घेणं, नाती सांभाळणं विशेष म्हणजे सासू-सासऱ्याचा स्वतःच्या आई-वडिलांसारखा सांभाळ करणं हे देखील शिकवायला हवं !

मुलाला शिकवायचं, नोकरी लावायची, छान घर बांधून द्यायचं अन् त्याच आई-वडिलांची अडचण कशी होऊ शकते मुलींना कळत नाही. पण किमयासारख्या मुली समाजात बघायला मिळतात. म्हणजे नवलच म्हणावं लागेल. आई- वडिलांनी रक्ताचं पाणी करून ज्या मुलाला घडवलं त्याच मुलाचं लग्न होताच आई- वडिलांनी एकदम त्याच्या आयुष्यातून एक्झीट घ्यायची. का ? तर त्यांना सुन-मुख हवंय, मुलाचं लग्न हवंय. पण अशा मुली स्वतःच्या भावांचा का नाही विचार करीत !

त्यांच्या येणाऱ्या वहिनींनी पण अशीच अपेक्षा ठेवली की लग्नानंतर आई-वडील नको. तर मुलींनी चांगल्या भविष्याचा विचार जरूर करावा पण कुटुंब तोडून नाही !

आणि हो कृपया फक्त वाचू नका तर मनःपूर्वक विचार करा ही विनंती. कारण आज संपूर्ण समाजात थोडेसे सोडले तर अशीच परिस्थिती आहे.

फक्त मान्य करायला मोठं मन हवं...

**लेखक :- अॅड.रविंद्र लक्ष्मण काटकर**
( जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय, अंबड
संपर्क :- ८३०८१५२७०५ )

# धनंजय मुंडेंवर टीका करताना विजय वडेट्टीवार यांची जीभ घसरली, वाद पेटणार?

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) : कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्यावर टीका करताना राज्याचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांची जीभ घसरली. राज्यातील शेतकऱ्यांना दुष्काळाच्या संकटात सोडून कृषी मंत्री परदेशात जातात कसे, तुम्ही दद मारायला मंत्री झालाय का? अशी टीका विजय वडेट्टीवार यांनी धनंजय मुंडे यांच्यावर केली. बियाणी मिळत नाहीत, शेतकरी एवढ्या उन्हात रांगा लावतोय. घामानं हैराण झालाय, शेतकऱ्यावर इतकी संकटं असताना हे बाहेर जातात कसे असा प्रश्न मला पडतो. तुमच्या विभागीय बैठकीला मंत्री उपस्थित राहणार नाही. मग काय तुम्ही दद मारायला मंत्री झाला का? फक्त टक्केवारी घेण्यात तुम्ही व्यग्र आहात.



तुम्हाला जेवढं लुटायचं तेवढं लुटा, असं वडेट्टीवार म्हणालेत. त्यामुळं वडेट्टीवारांच्या या टीकेला आता धनंजय मुंडे काय उत्तर देतील? याकडं सर्वांचं लक्ष लागलंय.

विजय वडेट्टीवार पत्रकार परिषद

जितेंद्र आव्हाड यांच्याकडून चूक पण... : पुढं बोलत असताना वडेट्टीवार म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधारेला मानणारा माणूस म्हणजे जितेंद्र आव्हाड आहे. चुकीला माफी नाही म्हणत त्यांनी स्वत:ची चूक सर्वांसमोर मान्य देखील केलीय. मात्र, आता मनुस्मृती मानणारा भाजपा त्याचं भांडवल करतंय. बाबासाहेबांचा सन्मान यांच्या मनात आहे का?, असा सवाल त्यांनी केला. तसंच पोटात एक आणि ओठात एक अशी भाजपाची भूमिका असल्याचंही वडेट्टीवार यावेळी म्हणाले.

पुण्यातील घटनेवर बोलताना : पुण्यातील हिट अँड रन प्रकरणासंदर्भात बोलत असताना ते म्हणाले की, घटना घडल्यानंतर आठ तास गुन्हा दाखल होत नाही. रक्ताचे नमुने बदलले जातात, हे सगळं आपण बघितलं. तसंच पोलीस आणि आरोग्य विभाग कुठल्यातरी राजकीय दबावाला बळी पडतोय. मग या प्रकरणातील सत्यता काय? हा खरा प्रश्न आहे. डॉ. अजय तावरेला निलंबित करा म्हणून तत्कालीन वैद्यकीय संचालक म्हैसेकर यांनी प्रस्ताव दिला होता. मात्र, त्यानंतर त्यांचा बदलीचा प्रस्ताव मंत्रालयात गेला. गेल्या दहा वर्षांपासून अजय तावरेची बदली झालेली नाही. याचाच अर्थ त्याला कुणाचा तरी राजाश्रय आहे असा होतो.

मराठवाड्यात भीषण दुष्काळ : मराठवाड्यात दुष्काळाची परिस्थिती अतिशय गंभीर आहे. पंचनामे होतात मात्र शेतकऱ्यांना मदत मिळत नाही. मराठवाड्यात शेतकऱ्यांना उद्धस्त करण्याचं काम झालंय. संभाजीनगरमध्ये १५६१ गावांना पाणीटंचाईचा सामना करावा लागतोय. या सर्व परिस्थितीत शेतकऱ्यांच्या सर्वाधिक आत्महत्या कृषी मंत्र्यांच्या बीड जिल्ह्यात झाल्यात. २६७ शेतकऱ्यांनी आपलं जीवन संपवलय. अनेक भागात १५-१५ दिवस पिण्याचं पाणी मिळत नाही. उद्या नाना पटोले हे देखील दुष्काळी भागाचा दौरा करणार आहेत. जालना जिल्ह्यातील जवखेडा गावातमधील कुंभार समाजाच्या कुटुंबासाठी मी मुद्दाम आलोय. बँकेचा कर्मचारी शेतकऱ्याला कर्ज मिळवण्यासाठी लाच मागतो, हे दुर्दैव आहे, असं वडेट्टीवार म्हणाले.

टक्केवारी घेणारे सरकार : पुढं ते म्हणाले, हे सरकार फक्त टक्केवारी आणि टेंडर घेण्यामध्येच व्यग्र आहे. त्यांनी निवडणुकीचं आणि आचारसंहितेचं कारण सांगून शेतकऱ्यांना मूर्ख बनवण्याचं काम केलं. दुसरीकडं मात्र निवडणूक आयोगाकडं परवानगी मागून २५,००० कोटीचं टेंडर काढलं. यांनी निवडणूक आयोगाकडं शेतकऱ्यांसाठी परवानगी मागितली असती तर नक्कीच मिळाली असती. मात्र, यांना मदत करायची नाही. गेल्या चार महिन्यांमध्ये अवकाळी पाऊस पडला, गारपीट झाली, विशेष करून यामध्ये सोयाबीन उत्पादक शेतकऱ्याचं मोठं नुकसान झालं.

आमच्या जाहीरनाम्यात शेतकरी मदत : या सरकारनं शेतकऱ्यांना सांगितलं हमीभाव देऊ, एमएसपी देऊ, मात्र काही दिलं नाही. अशातच खरीप हंगाम सुरू झाला. आमच्या जाहीरनाम्यामध्ये आम्ही स्पष्टपणे उल्लेख केलाय की, आमचं सरकार आलं तर आम्ही देशातील सगळ्या शेतकऱ्यांचं कर्ज माफ करू. राज्य सरकारला आमची मागणी आहे की या शेतकऱ्यांचं सर्व कर्ज माफ करावं. त्यांना मोफत बियाणं द्यावं, वीज बिल माफ करावं, आणि जी कर्जवसुली सुरू आहे तिला स्थगिती द्यावी. आज जनावरांना चारा नाही, पाणी नाही त्यामुळं सर्व जनावरांना सरकारनं चारा-पाणी उपलब्ध करून द्यावं. तसंच पिण्याच्या पाण्यासाठी जनता टाहो फोडत असताना सुद्धा टक्केवारी घेण्याचं काम या नतदृष्टांकडून होत असल्याचा आरोपही वडेट्टीवार यांनी यावेळी केला.

दानवे यांनी जमिनी बळकावल्या : पुढं केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांच्यावर हल्लाबोल करत वडेट्टीवार म्हणाले की, लोकांच्या जमिनी बळकावण्याची ज्यांना हाव आहे, अशा केंद्रीय मंत्र्यांनी भोकरदन तालुक्यातील एका कुंभार कुटुंबीयांची जमीन बळकावली.

# शुभवार्ता! वेळेआधी मान्सून केरळात धडकला!

## मुंबईसह, ठाण्यात मान्सून पूर्व पावसाचा यलो अलर्ट

मुंबई : गरमीने हैराण झालेल्या जनतेसाठी मान्सून संदर्भात आनंदाची बातमी आहे. मान्सून वेळेआधीच केरळात धडकला आहे. त्यामुळे आता मुंबईत मान्सूनची प्रतिक्षा आहे. मुंबईतही येत्या काही दिवसात मान्सूनची चाहूल लागण्याची शक्यता हवामान विभागाकडून वर्तवण्यात आली आहे. उन्हाच्या झळांनी हैराण झालेल्या नागरिकांसाठी एक दिलासादायक बाब म्हणजे मुंबई, ठाणे, पालघर आणि रायगड जिल्ह्यात पुढील ४८ तासात मान्सून पूर्व पावसाची हजेरी लागण्याची शक्यता आहे. शनिवारी आणि रविवारी या भागात जोरदार पावसाच्या सरी कोसळण्याचा अंदाज आहे.

कधीही कर्नाटकात पोहोचू शकतो मान्सून

आयएमडीच्या ताज्या अंदाजानुसार, केरळमध्ये ३० मे रोजी दाखल झालेला मान्सून कधीही कर्नाटकात पोहोचू शकतो. साधारणपणे, कर्नाटकात ३ जूनपासून मान्सूनचा पाऊस सुरू होतो. मात्र यंदा ३० मे रोजीच मान्सून केरळमध्ये पोहोचला. त्याच वेळी, त्याचा वेग अजूनही वेगवान आहे. कर्नाटकसाठी जारी केलेल्या दैनिक हवामान अहवालात म्हटले आहे की, नैऋत्य मान्सून उर्वरित नैऋत्य अरबी समुद्र, पश्चिम-मध्य अरबी समुद्राचा काही भाग, आग्नेय अरबी समुद्राचा बहुतांश भाग आणि लक्षद्वीप प्रदेश, केरळ आणि इतर भागांमध्ये प्रगती करत आहे. दक्षिण तामिळनाडू, मालदीव आणि कोमोरिन प्रदेशात काही भागात मुसळधार पाऊस पडत आहे.

मुंबईत दोन दिवस पावसाचा यलो इशारा



### मुंबईसह महाराष्ट्रात मान्सून कधी दाखल होणार?

मुंबईत १०-११ जूनच्या सुमारास मान्सूनचा पाऊस पडू शकतो. हवामान विभागाच्या माहितीनुसार, केरळमध्ये मान्सून दाखल झाल्यानंतर पुढील काही दिवसांत साधारण १० किंवा ११ जूनला मुंबईत मान्सून दाखल होण्याची शक्यता आहे. मान्सूनचा पहिला पाऊस मुंबई दाखल झाल्यानंतर येत्या ४ ते ५ दिवसात तो उर्वरित महाराष्ट्रात पोहोचेल, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

मुंबईत सध्या काही भागात पारा कमालीचा वाढला आहे. मुंबईकरांना कडक उन्हापासून दिलासा मिळणार आहे. मुंबई, ठाणे आणि रायगड जिल्ह्यात शनिवारी आणि रविवारी जोरदार पावसाचा शक्यता आहे, अशी माहिती भारतीय हवामान विभागाने दिला आहे. आयएमडीने मुंबई, ठाणे आणि रायगड या भागात पावसाचा यलो अलर्ट दिला आहे.


मुसळधार पाऊस ते अतिवृष्टीचा इशारा

हवामान विभागाच्या ताज्या अंदाजानुसार, देशाच्या ईशान्येकडील राज्यांमध्ये मुसळधार ते अति मुसळधार पाऊस पडू शकतो. यामुळे अरुणाचल, आसाम, मेघालय, सिक्कीम या भागात अतिवृष्टीचा इशारा आयएमडीने दिला आहे. याशिवाय अंदमान-निकोबार बेटे आणि केरळमध्ये मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

# दहावीच्या परीक्षेत श्रद्धा घोरडचे घवघवीत यश

गेवराई । प्रतिनिधी

तालुक्यातील कृषी पंडित भागुजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाची विद्यार्थिनी कु. घोरड श्रद्धा रामदास हिने शालांत प्रमाणपत्र परीक्षेत ९३.६०% गुण मिळून घवघवीत यश मिळविले आहे शालांत प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून कु. घोरड श्रद्धा रामदास या



विद्यार्थिनींने मराठी विषयात -९२ हिंदी -८९ इंग्रजी -९४ गणित -८४ विज्ञान-९४ सामाजिक शास्त्र -८४ असे एकूण ५०० पैकी ४६८ गुण मिळवून घवघवीत यश संपादन केल्याबद्दल तिचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# दहावी च्या परीक्षेत कु.श्रावणी जाधव हिने ९८.६० % टक्के घेऊन मिळवले यश

पाटोदा ।नितिन भोंडवे

यावर्षी घेण्यात आलेल्या एसएससी बोर्ड परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला आसुन त्यामध्ये पाटोदा तालुक्यातील उखंडा गावची कू. जाधव श्रावणी नारायण हिने ९८.६०% टक्के घेऊन घवघवीत यश मिळवलं आहे तिचे सर्वत्र कौतुक होत आहे.

उखांडा येथील प्रसिद्ध उद्योजक गजानन ट्रेडिंग कंपनीचे मालक चेअरमन नारायण जाधव ह्यांची मुलगी आहे. तिने यश संपादन करत पालकांची मान उंचवण्याचे काम केले आहे. अभ्यासात सातत्य, शिक्षक वृंद, आई-वडील, भाऊ- बहीण, यांचे योग्य मार्गदर्शन यामुळेच आपण हे यश मिळवू शकलो असे मत तिने व्यक्त केले. दरम्यान यशाबद्दल तिचे शाळेचे




मुख्याध्यापक, शिक्षक वृंद व नातेवाईकांकडून अभिनंदन व कौतुक होत आहे.

# ओमकार औटे,आदित्य औटे,महेश औटे दहावी बोर्ड परीक्षेत उत्तीर्ण


आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालक्यातील शेतकरी शिक्षण संस्था महेश विद्यालय रूईनालकोल व महात्मा गांधी विद्यालय कर्जत इयत्ता दहावीचा विद्यार्थी ओमकार महादेव औटे,८६.६०%आदित्य अशोक औटे८४.२०%,महेश नवनाथ औटे ह्याने दहावीच्या परीक्षेत ८१% टक्के गुण प्राप्त केले आहेत यांच्या या यशाबद्दल पत्रकार संघाचे पदाधिका-यांनी सर्व पत्रकारांनी,शाळेतील शिक्षकांनी अभिनंदन केले आहे.



# मतमोजणीच्या ३२ फेऱ्या

बीड - बीड लोकसभा मतदारसंघाची मतमोजणी ४ जून रोजी सकाळी ८ वाजता सुरू होणार आहे. सुरुवातीला पोस्टल मतांची मोजणी करण्यात येणार असून ८.३० वाजता मतमोजणीला सुरुवात होईल. साधारणत: १० तासांत निकाल हाती येईल. १४ टेबलवर पंधरा मिनिटांत एक फेरी होणार आहे. एकूण ३२ फेऱ्या होणार आहेत. मतमोजणी केंद्रासह संपूर्ण परिसर सीसीटीव्हीच्या निगराणीखाली राहणार आहे. मतमोजणी केंद्राबाहेर उपस्थितांना प्रत्येक फेरीची माहिती देण्यासाठी लाऊडस्पीकरची व्यवस्था करण्यात आली असल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी दीपा मुधोळ-मुंडे शुक्रवारी दुपारी पत्रकार परिषदेत दिली. या वेळी पोलिस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांची उपस्थिती होती.मत मोजणीची प्रक्रिया निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार होणार असून मतमोजणीच्या दिवशी ४ जून रोजी कर्तव्यावर असणाऱ्या सर्व अधिकारी, कर्मचारी पहाटे ५.३० वाजता नाथापूर रोड खंडेश्वरी मंदिराजवळील शासकीय तंत्रनिकेतन या मतमोजणी केंद्रात उपस्थित राहणार आहेत. उमेदवारांच्या प्रतिनिधींनाही सकाळी ७ वाजता त्याठिकाणी उपस्थित राहावे लागणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी दीपा मुधोळ-मुंडे यांनी दिली. यामुळे आता मतमोजणीची तयारी पूर्ण झालेली आहे.



गडबड, गोंधळ करणाऱ्यांवर कारवाई


निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतमोजणीची प्रक्रिया पार पडणार आहे. अधिकारी, कर्मचाऱ्यांना आवश्यक त्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. मतमोजणी केंद्रात कोणालाही मोबाइलसह प्रवेश करता येणार नाही. मतमोजणी दरम्यान गडबड, गोंधळ करणाऱ्यांवर थेट पोलिस कारवाई करण्यात येईल, असे पोलिस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांनी सांगितले.एनकोर सॉफ्टवेअरमध्ये डेटा एंट्री पूर्णशिवाय निकाल जाहीर होणार नाही मतमोजणी दरम्यान टपाली मतमोजणीचा कोणताही टप्पा सुरू असेल तरी मशीनवरील मतमोजणी चालू राहील. एनकोर सॉफ्टवेअरमध्ये डेटा एंट्री पूर्ण झाल्याशिवाय अंतिम निकाल जाहीर होणार नाही. व्हिक्टरी मार्जिन हे एकूण टपाली मतांपेक्षा कमी असल्यास अशा वेळी उमेदवाराने मागणी केली नसेल तरी टपाली मतपत्रिकांची फेर मोजणी केली जाईल. या वेळी अवैध ठरविण्यात आलेल्या टपाली मतपत्रिका देखील निवडणूक निर्णय अधिकारी व निवडणूक निरीक्षक यांच्यासमोर पुन्हा एकदा तपासण्यात येणार आहेत.

# सिरसाळा- सोनपेठ रस्त्याची चाळणी, नागरिकांची गैरसोय

## दहा वर्षापासून रस्ताची वाट बिकट बनली

सिरसाळा - परळी तालुक्यातील सिरसाळा- सोनपेठ या दोन किलोमीटर पर्यंत रस्त्याची अक्षरशः चाळणी झाल्याने आता वाहन चालवणे एक आव्हान बनले आहे. गेल्या अनेक वर्षापासून हा रस्ता दुरुस्त करण्याची मागणी ग्रामस्थांनी करण्यात आली होती. परंतु, लोकप्रतिनिधीने याकडे दुर्लक्ष केले.

परभणी जिल्ह्याला जोडणारा हा महत्त्वाचा रस्ता समजला जातो. दहा वर्षापासून या रस्ताची वाट बिकट बनली आहे. जागोजागी खड्डे, धुळीचे साम्राज्य व रहदारी यामुळे अनेकवेळा अपघाताच्या घटना घडत आहेत. कंत्राटदराने अनेकदा तात्पुरती डागडुजी करून




बिले उचलल्याचा आरोप होत आहे. सोनपेठ शहर दहा किलोमीटर असून यामध्ये गावापासून दोन किलोमीटर रस्ता जागोजागी खड्डे पडल्याने वाहनदार चालकाला कसरत करावी लागते. या रस्त्यावरून सोनपेठ-सिरसाळा अपडाऊन करणारे विद्यार्थी, व्यापारी, शेतकरी, यासह कौडगाव, पिंपळगाव, आचार्य टाकळी, कानडी या गावातील ग्रामस्थांसाठी मुख्य रस्ता समजला जातो.

या रस्त्यावर वीटभट्टीचालक, वाळूची हायवा, जड वाहने सर्रास चालू असल्याने रस्त्याचे चाळणी बनली आहे. हा रस्ता दुरुस्तीसाठी अनेकदा ग्रामस्थांनी लोकप्रतिनिधींना साकडे घातले परंतु याकडे सर्रास दुर्लक्ष करण्यात आले. रस्ता दुरस्तीची किंवा नवा रस्ता तयार करण्याची मागणी पुन्हा एकदा करण्यात आली आहे.याकडे लक्ष देण्याची गरज आहे.

# बीडला कारमधून ६० किलो गांजा जप्त

दिंद्रुड - बाहेरील राज्यातून आणलेला गांजा पंढरपूर-खामगावमहामार्गाने जालना येथे घेऊन जाताना, तेलगावनजीकपोलिसांनी पकडला. बीड स्थानिक गुन्हे शाखा व दिंद्रुडपोलिसांनी ही कारवाई केली. एकूण ९ लाख ६२ हजार३३६ रुपयांचा गांजा तेलगाव-नित्रुड रस्त्यावर एकाहॉटेलसमोर शुक्रवारी (दि.३१ मे) पहाटे पोलिसांनीपकडला. कारवाईत कारसह चौघांना पोलिसांनी ताब्यातघेतले. अंबाजोगाईवरून धारूर, तेलगाव,माजलगावमार्गे जालना येथे पांढऱ्या रंगाच्या कारने(एमएच ०३ बीसी ५२७१) गांजा नेला जात असल्याचीमाहिती पोलिसांना मिळाली होती. त्यामुळे बीड स्थानिकगुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक संतोष साबळे यांच्यापथकाने व दिंद्रुड पोलिस ठाण्याचे सहायक पोलिसनिरीक्षक अण्णाराव खोडेवाड, बालाजी सुरेवाड, अनिलभालेराव, मुकेश शेळके यांनी दिंद्रुड हद्दीतील नित्रुडशिवारात पंढरपूर-खामगाव महामार्गावर सापळा रचलाहोता. संशयितांची कार येताच चौघांना पकडले.



कारच्या डिकीत तीस खाकी रंगाची पाकिटे आढळली

परराज्यातून आणलेला गांजा जालन्याला घेऊन जाताना कारसह चौघांनापोलिसांनी पकडले. कारवाईत पकडलेला गांजा व जप्त केलेली कार.. त्यात हिरवट रंगाचापाला व बारीक भुरकट रंगाची फुले, बिया, बोंडे, काड्या असा एकूण साठकिलो गांजा आढळला. त्याची किंमत ९ लाख ६२ हजार रुपये आहे. कार वइतर साहित्य असा एकूण १४ लाख १२ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्तकेला.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT